F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिकामार्ग, पत्रपेटीक्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६
ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.inवेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ - ई-मेलद्वारे/स्पीड पोस्टद्वारे**

क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/ ३२७
दिनांक : ६/ १० /२०२०

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय : **महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या कार्यवाहीसाठी वाढीव मुदतीबाबत ......**

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/५७० दि.२३/१२/२०१९
२. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/७९ दि.२८/०२/२०२०
३. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१३७ दि.२०/०५/२०२०
४. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१४२ दि.०१/०६/२०२०
५. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१५५ दि.०८/०७/२०२०
६. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१९० दि.२६/०८/२०२०
७. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/३१७ दि.११/०९/२०२०
८. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०/३२२ दि. २२/०९/२०२०

**आपले सरकार डी.बी.टी.पोर्टल** ( संकेतस्थळ : **https://mahadbtmahait.gov.in** ) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला असून त्यामधील खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
३) उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ( भाग-१, वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून )

सन २०१९-२० च्या **महाडीबीटी पोर्टलवरील** उपरोक्त योजनांच्या अंमलबजावणीसाठी, उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, सर्व विभागीय कार्यालयांना त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या संस्थांच्या लॉगीनमध्ये योजनांसाठीचे विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले अर्ज तपासणीसाठी पोर्टलवर जाहिर केलेल्या मुदतवाढीच्या कालावधीमध्ये प्रलंबित न ठेवता निकाली काढण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते तसेच " **विद्यार्थी / संस्था / विभागीय कार्यालयांनी पोर्टलवर वेळोवेळी जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार आपापल्या स्तरांवरील कार्यवाही न चुकता पूर्ण करावी.**" असेही कळविण्यात आलेले होते. तरीदेखील काही विद्यार्थ्यांचे अर्ज मुदतीमध्ये तपासणी न केल्याने संस्थांस्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबतचा पोर्टलवरील योजना व विभागनिहाय अहवाल सोबत जोडला आहे. ज्या संस्थांचे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित आहेत अशा संस्थांना संदर्भीय पत्र क्र.८ अन्वये नोटीस बजावून खुलासा मागणी करण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

शासनाने प्रलंबित अर्जांची तपासणी करुन निकाली काढण्यासाठी सोबत जोडलेल्या महाडीबीटी पोर्टलवर जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार संस्थांसाठी **दि.१०/१०/२०२० पूर्वी** व कार्यालयांसाठी **दि.१५/१०/२०२० पूर्वी** निकाली काढण्याबाबत सूचित केले आहे.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना या पत्राद्वारे सुचित करण्यात येतें की, आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व संस्थांना,संस्थांच्या लॉगीनआयडी अंतर्गत तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज तसेच **Sent Back ( Revert झालेले )** अंतर्गत असलेल्या अर्जांची त्रुटी दूर करुन अंतिम दिनांकापूर्वी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयानुसार सर्व प्राप्त अर्जांची तपासणी करुन निकाली काढण्याबाबत सूचित करावे. तसेच, सर्व विभागीय कार्यालयांनीदेखील त्यांच्या लॉगीन आयडीमधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जांची संबंधित योजनेच्या शासन निर्णयानुसार सर्व प्राप्त अर्जांची तपासणी **दि.१३/१०/२०२० पूर्वी** करुन निकाली काढावेत. तसेच संस्था व विभागीय स्तरांवर कोणतेही अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता सहसंचालक यांनी स्वत: घ्यावी. तसेच विद्यार्थी / संस्था / विभागीय कार्यालयांनी त्यांच्या लॉगीनमध्ये **Sent Back अंतर्गत** व **तपासणीसाठी** प्रलंबित असलेले अर्ज अंतिम तारखेनंतर सिस्टिमद्वारे Automatic नामंजूर करण्यात येतील व याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील आणि यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ. )
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

सोबत - वरीलप्रमाणे .

प्रत : यांना माहितीसाठी सविनय सादर.
१) मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा. अप्पर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला मंत्रालय, मुंबई-३२
३) मा. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, ५ वा मजला, मंत्रालय ॲनेक्स बिल्डिंग, मादाम कामा रोड, मुंबई.

## Directorate of Technical Education

### Dashboard Report -06-10-2020 -F.Y.2019-2020

#### Schemewise

| Scheme | Application Received | Approved By Institute | Pending At Institute | Approved By Department | Cancelled | Pending At Department | Rejected | Sent back to applicant | Alloted | Alloted Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 70,007 | 54,972 | 280 | 54,972 | 12,192 | 0 | 500 | 2,063 | 51,176 | ₹ 1,11,37,72,000 |
| Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 2,26,432 | 1,81,073 | 535 | 1,81,073 | 39,947 | 0 | 1,579 | 3,298 | 1,80,209 | ₹ 6,19,45,63,347 |
| Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 27,452 | 22,234 | 173 | 22,234 | 3,826 | 0 | 466 | 753 | 22,063 | ₹ 52,33,78,462 |
| **Directorate of Technical Education Total** | **3,23,891** | **2,58,279** | **988** | **2,58,279** | **55,965** | **0** | **2,545** | **6,114** | **2,53,448** | **₹ 7,83,17,13,809** |

#### RO wise

| Division | Application Received | Approved By Institute | Pending At Institute | Approved By Department | Cancelled | Pending At Department | Rejected | Sent back to applicant | Alloted | Alloted Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Amravati | 8,061 | 6,519 | 67 | 6,519 | 1,138 | 0 | 59 | 278 | 6,374 | ₹ 17,24,45,280 |
| Aurangabad | 46,858 | 35,384 | 223 | 35,384 | 8,494 | 0 | 694 | 2,063 | 34,887 | ₹ 84,70,65,671 |
| Mumbai | 49,614 | 39,295 | 165 | 39,295 | 8,726 | 0 | 337 | 1,091 | 38,606 | ₹ 1,46,30,80,610 |
| Nagpur | 14,831 | 11,817 | 54 | 11,817 | 2,161 | 0 | 443 | 356 | 11,607 | ₹ 42,56,73,067 |
| Nashik | 39,216 | 32,451 | 84 | 32,451 | 5,492 | 0 | 469 | 720 | 32,027 | ₹ 87,93,19,191 |
| Pune | 1,65,311 | 1,32,813 | 395 | 1,32,813 | 29,954 | 0 | 543 | 1,606 | 1,29,947 | ₹ 4,04,41,29,992 |
| **Directorate of Technical Education Total** | **3,23,891** | **2,58,279** | **988** | **2,58,279** | **55,965** | **0** | **2,545** | **6,114** | **2,53,448** | **₹ 7,83,17,13,809** |

## Important Dates

| | |
|---|---|
| Institute Profile Update and Approval by FRA/ SSS/ Dept. before | 2020 January 15 |
| Institute Scrutiny for Merit Schemes before | 2020 October 10 |
| Department Scrutiny for Merit Schemes before | 2020 October 15 |
| Institute Scrutiny for Other schemes - 1st Installment before | 2020 October 10 |
| Department Scrutiny for Other Schemes - 1st Installment before | 2020 October 15 |